# फळझाडांचा बहार धरणे

आशा बहादुरे करण जाधव विशाखा कोल्हे
आचार्य पदवी विद्यार्थी (फळशास्त्र विभाग) आचार्य पदवी विद्यार्थिनी (भाजीपाला विभाग)
डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला

झाडांना फुलधारण्याच्या अगोदर एक ते दीड महिना अवधीत करून त्याची शाखीय वाढ थांबवणे व झाडांना सुक्त अवस्थेत नेणे म्हणजेच बहार धरणे होय जमीन भारी असल्यास जास्त दिवस पाण्याचा ताण देतात त्यामुळे झाडातला अन्नपुरवठा संचित होऊन त्यापासून फुल व फळ धरलेला मदत होते. यामध्ये विविध फळझाडांना अनेक प्रकारे बहार येतात बहार येण्याच्या कालावधीवरून त्या बहारांचे आंबे बहार मृग बहार व हस्तबहार असे तीन प्रकार पडतात.

**बहार का धरावा:**

- काही फळझाडांवर वर्षभर तीनही हंगामामध्ये फुले फळे येत असतात अशा फळझाडांना विश्रांती न मिळाल्याने झाडाच्या वाढीवर अनिष्ट परिणाम होतो फळझाडांची वाढ नियंत्रित न ठेवल्यास झाडांवर वर्षभर निरनिराळ्या आकारांची फळे दिसतात
- एका हंगामातील फळे झाडावर असल्यास दुसऱ्या हंगामाचा बहार कमी प्रमाणात येतो त्याशिवाय कीड व रोगांचा प्रादुर्भाव वाढतो वर्षभर फळझाडांची राखण व फळांची तोडणी करावी लागते उत्पादन खर्च वाढतो पर्यायाने नफ्याचे प्रमाण घटते म्हणून वर्षभर फुले व फळे येण्याचे चक्र नियंत्रित करून कोणत्याही हंगामात बहार धरणे उपयुक्त ठरते
- बहार प्रक्रियेमध्ये झाडावर एकाच वेळी फळे तयार होतात त्याचे तोडणी एका वेळी होऊन फळे बाजारात एकदम पाठविता येतात किडी आणि रोगांचा प्रसार कमी राहतो तसेच नियंत्रणही सुलभ होते उत्पादन खर्चात बचत होते झाडांचे उत्पादन युक्त आयुष्य वाढण्यास चांगली मदत होते

**आंबे बहार:** हा बहार नैसर्गिक बहार असून उत्तर भारतात जास्त प्रमाणात धरला जातो जेव्हा मोहोर येतो त्या वेळेला म्हणजेच जानेवारी ते फेब्रुवारी हा बहार येतो या बहाराची फुले जानेवारी फेब्रुवारीत लागतात व फळे उन्हाळ्यापासून ते पावसाळ्याच्या सुरुवातीपर्यंत येतात महाराष्ट्रामध्ये हा बहार धरल्यास फळे पावसाळ्यात पिकतात त्यामुळे फळाची प्रत बिघडते किडीचा प्रादुर्भाव जास्त होतो त्यामुळे हा बहार सहसा धरला जात नाही.

**मृग बहार:** मृग नक्षत्रात म्हणजेच जून - जुलै महिन्यात येणाऱ्या बहाराला मृगबहार असे म्हटले जाते. या बहारामध्ये झाडांची पाणी एप्रिल ते मे मध्ये तोडले जाते या भागातील झाडांना जूनमध्ये फुले लागतात त्यामुळे फुले येण्याच्या अगोदर उन्हाळा असल्याने पाणी उपलब्ध कमी असते त्यामुळे झाडांना आपोआप ताण बसतो म्हणून महाराष्ट्रात हा बहार धरणे सोयीचे होते याची फळे पावसाळा संपल्यावर येत असल्याने किडीचा प्रादुर्भाव सुद्धा कमी असतो.

**हस्त बहार:** हस्त नक्षत्रात म्हणजेच सप्टेंबर - ऑक्टोबर महिन्यामध्ये येणाऱ्या बहाराला हस्तबहार असे म्हटले जाते. हा बहार हस्त नक्षत्रामध्ये उबर मध्ये सुरू होतो याचे पाणी जुलै ऑगस्ट मध्ये बंद करतात व फुले सप्टेंबर ऑक्टोबर मध्ये येतात तर फळे एप्रिल ते मे मध्ये पक्व होतात महाराष्ट्रात हा बहार सहसा धरत नाहीत बाजारपेठेची उपलब्धता व फळझाडांचा बहार संपल्यावर पाण्याची सोय यावर कोणता बहार धरायचा आहे हे अवलंबून असते

वरील तिन्ही बहारापैकी मृग बहार धरणे हे अधिक फायद्याचे ठरते.

**बहार धरण्यापूर्वी खालीलप्रमाणे काही बाबींचा अवलंब करावा लागतो**

- फळझाडांचा पाणीपुरवठा काही काळ थांबविणे म्हणजेच झाडं स्थान देणे.
- मशागत करून काही प्रमाणात मुळे उघड्या करून त्यांचे कार्य थांबविणे.
- झाडाची पानगळ करून घेणे.
- ठराविक काळासाठी झाडाची सुप्त अवस्था टिकवून ठेवणे.
- वरील बाबींची पूर्तता झाल्यानंतर झाडांना वाफे किंवा आळी बांधून खते घालून पाणी दिले जाते त्यानंतर झाडांना बहार यायला सुरुवात होते व्यवस्थितपणे पूर्ण झाली तर फळधारणा चांगली होऊन अधिक प्रमाणात फळे लागतात अशा रीतीने आलेल्या फळांचे वय आणि आकारमान एकसारखे येथे आणि ती फळे उच्च प्रतीची असतात व एकाच वेळी पक्व देखील होतात.

**बहार घ्यावयाची अचूक वेळ:**

- बहार येण्यासाठी त्या झाडांना विश्रांतीची आवश्यकता असते नैसर्गिकपणे हे विश्रांती मिळत नसल्यास पाण्याचा ताण देऊन झाडांना विश्रांती घेण्यास भाग पाडावे लागते थोडक्यात म्हणजे भरपूर फळ उत्पादनासाठी झाडांना विश्रांती देऊन वर्षातून कोणत्याही एका हंगामात बहार घेणे फायदेशीर असते मात्र कागदी लिंबाचा एकच बहार न धरता फळे वर्षभर घेणे फायदेशीर ठरते.
- रोपांची लावणी केल्यापासून पहिल्या तीन ते साडेतीन वर्षापर्यंत झाडांची पालेदार वाढ उत्तम आणि जोमदार करून झाडांचा मजबूत बुंधा तयार झाला पाहिजे. या काळात जर झाडावर फुले आणि फळे वाढू दिसल्यास झाडे कमजोर राहतात. म्हणून पहिले तीन ते साडेतीन वर्ष झाडावरील फुले व फळे खुडून टाकावी. फळ झाडाचे योग्य उत्तम वाढ झाल्यानंतर चौथ्या पाचव्या वर्षी झाडावर फळधारणा होऊ द्यावी.

(संपर्क: +९१ ७७४३८७०६१८)

★ ★ ★